**पुरवठा आयुक्तांचे कार्यालय,**
जी.डब्ल्यू.एन.डी.ऑफिस तळमजला,
कॉटन ग्रीन स्टेशन जवळ, काळाचौकी ,मुंबई-४०००३३,
दुरध्वनी क्र.०२२- २३७२१९१२, ई-मेल-supplycommissioneroffice@yahoo.co
सार्वजनिक वितरण व्यवस्था तक्रार निवारण प्रणाली हेल्पलाईन टोल फ्रि क्रमांक: १८००-२२-४९५०

क्र. आस्था-४०२०१८/प्र.क्र.४३९५/वा.चा.नेमणूक/कक्ष-१ दिनांक - 2 डिसेंबर,२०२०

प्रति,

कक्ष अधिकारी, संगणक कक्ष
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

## आमंत्रणपत्र

पुरवठा आयुक्त् कार्यालयातील आस्थापनेवरील वाहन चालक पदावर बाहययंत्रणेद्वारे नियुक्ती करण्याबाबत अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचे क्र.आस्थाप्र-१८१८/प्र.क्र.११०/ना.पु. १२, दिनांक २९/८/२०१८ च्या पत्रान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. त्यामुळे शासनाच्या प्रचलित नियमानुसार खुल्या स्पर्धात्मक कंत्राटी पध्दतीने वाहनचालकाची नियुक्ती करण्याकरीता सोबतच्या प्रपत्र-अ मधील अटी व शर्तीच्या अधीन राहून निविदाद्वारे मागविण्यात येत आहे.

खुल्या स्पर्धात्मक निविदा मागवून L-१ ज्यांचे कमीत कमी दर असतील अशा वाहनचालकाची खुल्या स्पर्धात्मक निविदा मागवून कंत्राटी पध्दतीने वाहनचालकाची नियुक्ती करण्याकरीता मा. उप संचालक, नागरी पुरवठा, पुरवठा आयुक्तांचे कार्यालय, मुंबई-४०००३३ यांचे नावाने मोहोरबंद पाकीटातून या कार्यालयाच्या पत्त्यावर टपालाने पाठविण्यात यावी.

(सं.मा.जाधव)
प्रभारी उप संचालक,नागरी पुरवठा,
महाराष्ट्र शासन.

## <u>प्रपत्र-अ</u>
## <u>अटी व शर्ती</u>

मोहोरबंद लिफाफ्यावर कंत्राटी पध्दतीने वाहनचालकाची नियुक्ती करण्यासाठी असे लिहिणे आवश्यक आहे.

१. निविदा दरपत्रक सादर करावयाचे ठिकाण - **पुरवठा आयुक्तांचे कार्यालय ,**
जी.डब्ल्यू.एन.डी.ऑफिस तळमजला,
कॉटन ग्रीन स्टेशन जवळ, काळाचौकी ,मुंबई-३३,
दुरध्वनी क्र.०२२- २३७२१९१२,०२२-२३७२६६१३,
ई-मेल-supplycommissioneroffice@yahoo.co

२. प्राप्त निविदा दरपत्रक दिनांक ०८/१२/२०२० रोजी दुपारी ठिक २.०० वाजता पुरवठा आयुक्त कार्यालय, जी.डब्ल्यू.एन.डी.ऑफिस तळमजला,कॉटन ग्रीन स्टेशन जवळ, काळाचौकी ,मुंबई-३३, येथे प्राप्त् होईल असे बघावे तसेच मोहोरबंद लिफाफे दि.०८/१२/२०२० रोजी ठिक ३.३० वाजता उघडण्यात येतील. सदर निविदा उघडतेवेळी पुरवठादार स्वत: किंवा त्यांचा प्रतिनिधी उपस्थित राहू शकतो.

३. सदर सेवा ही पुर्णपणे कंत्राटी व तात्पुरत्या स्वरुपाची असून नियुक्त वाहनचालकांना भविष्यात या पदावर नियुक्तीचा कोणताही अधिकार प्राप्त होणार नाही.

४. वाहनचालक किमान दहावी/बारावी इयत्ता उत्तीर्ण व भारतीय नागरीक असावा. तसेच वाहनचालकास मराठी लिहिता वाचता येणे आवश्यक राहील. तसेच हिंदी / इंग्रजीचे किमान ज्ञान असेल. शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्राच्या सत्यप्रती या कार्यालयास सादर करणे मक्तेदारावर बंधनकारक राहिल.

५. संस्थेतर्फे पुरविण्यात येणारा वाहनचालक गुन्हेगारी पार्श्वभूमीचा नसावा. त्यासंदर्भात कंत्राट दिल्यानंतर संबंधित वाहनचालकाचे पोलीस तपासणी अहवाल देणे बंधनकारक राहील.

६. वाहनचालकाजवळ वाहन चालविण्याची वैध अनुज्ञप्ती असेल, त्याचे ओळखपत्र त्याच्याजवळ असेल.

७. वाहनचालकाने वर्दीवर असतांना नशापान/धुम्रपान व तंबाखुजनक पदार्थाचे सेवन करु नये.

८. वाहनास अपघात झाल्यास व दुर्दैवाने वाहनचालकास कोणत्याही स्वरुपाची वा गंभीर स्वरुपात इजा झाल्यास वाहनचालकास वैद्यकीय खर्चाची अथवा नुकसान भरपाईची कोणतेही दायित्व या कार्यालयावर राहणार नाही.

९. कंपनी/संस्थेतर्फे काम करणाऱ्या वाहनचालकांच्या सेवेचे कोणतेही उत्तर दायित्व या कार्यालयावर राहणार नाही.

१०. वाहनचालकाचे वय ६० वर्षापेक्षा जास्त नसावे आणि १८ वर्षापेक्षा कमी नसावे.

११. मागणी केलेल्या कालावधीसाठी वाहनचालक उपलब्ध होऊ शकत नसेल अशा वेळी पर्यायी व्यवस्था संस्था करेल. अन्यथा दंडात्मक शुल्क भरण्यात येईल.

१२. मान्यवरांच्या आवश्यकतेनुसार कार्यालयीन वेळेव्यतिरिक्त वाहनचालकास काम करणे आवश्यक राहील.